I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** मंगळवेढा **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0294 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/04/2026 14:44 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मंगळवार **Date from (दिनांक पासून):** 24/03/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 24/03/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 15:16 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:58 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 20/04/2026 **Time (वेळ):** 14:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 031 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 20/04/2026 14:27 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 02 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** मंगळवेढा मल्टीस्पेशालिटी हस्प,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** रविंद्र हिम्मत लांभाते

**(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1988 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):**भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):**

**(i) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , सोलापूर, मंगळवेढा, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , सोलापूर, मंगळवेढा, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7038401100

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| **S. No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address(वर्तमान (पत्ता))** |
|---|---|---|---|---|
| 1 | ड.अरूणकुमार महिंद्रकर | | | 1. Town/Village (शहर / गाव): मंगळवेढा मल्टीस्पेशालिटी हस्प,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): मंगळवेढा,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | सोमनाथ इंगळे | | | 1. Town/Village (शहर / गाव): मंगळवेढा मल्टीस्पेशालिटी हस्प,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): मंगळवेढा,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S. No. (अ.क्र.)** | **Propertty Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (विवरण)** | **Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्यादी जबाब दि.20/04/2026

मी रविंद्र हिम्मत लांभाते, वय - 38 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 7038401100 समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे ऑगस्ट 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.24/03/2026 रोजी दुपारच्या सुमारास आम्ही कार्यालयात असताना तक्रारदार सावळाराम विष्णू यादव रा. आंबेचिंचोली, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांनी फोन करून त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार दिली. सदर तक्रारीबाबत आम्ही पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांना कल्पना दिली असता त्यांनी पडताळणी करून पुढील कारवाई करणेबाबत आम्हाला तोंडी आदेश दिले. त्यानुसार आम्ही आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत तहसील कार्यालय, उत्तर सोलापूर या कार्यालयास पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार करून दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेतले. सुमारे 12.30 वा चे सुमारास 1) विठ्ठल जगन्नाथ केरे, पद- ग्राममहसूल अधिकारी 2) यशवंत शंकर रोकडे, पद- ग्राममहसूल अधिकारी हे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि सोलापूर या कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी मी दोघा पंचांना पोलीस उपअधीक्षक श्री प्रशांत चौगुले यांची व माझी ओळख सांगुन तक्रारदार यादव यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मंगळवेढा येथे जाऊन पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता, दोन्ही पंच साक्षीदार यांनी पंच म्हणून काम करण्यास त्यांची संमती दिली. त्यानंतर आम्ही आमच्या कार्यालयातील पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, चालक पोकॉ/2026 श्रीराम यांना बोलावून घेतले आणि दोन्ही पंचांची ओळख करून देऊन गोपनीय कामकाजासाठी बाहेर जायचे असल्याचे सांगुन त्याकरीता आवश्यक सर्व साहित्य शासकीय वाहनात घेण्यास सांगितले. गोपनीय कामाकरीता आवश्यक व्हाईसरेकॉर्डर, मेमरीकार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, सील, अँन्थ्रासीन पावडर, अल्ट्राव्हायोलेट दिवा इ. सर्व साहित्य शासकीय वाहन एम.एच.12 यु.सी 4108 या वाहनामध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर 13.45 वा चे सुमारास शासकीय वाहनातून पो.उप अधीक्षक चौगुले दोन्ही शासकीय पंच, पथकातील अंमलदार व आम्ही स्वतः असे सर्वजण मंगळवेढा दिशेने रवाना झालो. यादरम्यान आम्ही तक्रारदार यांच्याशी संपर्कात राहून त्यांच्या सांगण्यानुसार मंगळवेढा मरवडे रोडवरील बोराळे नाक्याजवळ रस्त्याच्याकडेला एका झाडाखाली तक्रारदार थांबलेल्या ठिकाणी 14.40 वा. जाऊन पोहोचलो. सदरठिकाणी गेल्यानंतर आम्ही तक्रारदार यादव व त्यांच्यासोबत उपस्थित त्यांचे मित्र नानासाहेब भोई यांना शासकीय वाहनामध्ये बोलावून पो.उपअधीक्षक चौगुले, दोन्ही शासकीय पंचांची, आमची व पथकातील अंमलदारांची ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही अंमलदारांना वाहनातून खाली उतरवून तक्रारदार यादव यांना पंचासमक्ष त्यांचे नाव, पत्ता व त्यांची तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव व पत्ता सावळाराम विष्णू यादव, रा. आंबेचिंचोली, ता. पंढरपूर, जि. सोलापूर असे असल्याचे सांगून, त्यांची आई सौ.मंगल विष्णू

यादव या घरासमोर पाय घसरून पडल्याने पायास दुखापत झाली होती. तिचे पाय खूप दुखत असल्याने दि.17/03/2026 रोजी मंगळवेढा येथील मंगळवेढा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल (महिला हॉस्पिटल) येथे दाखल केले. सदर हॉस्पिटलमधील डॉ. अरुणकुमार महिंद्रकर यांनी आईच्या पायाची तपासणी करून पायाचे हाड फ्रॅक्चर असल्याने ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हालाकीची असल्याने त्यांच्या आईच्या पायाचे ऑपरेशन महाराष्ट्र शासनाचे महात्मा ज्योतीबा फूले जनआरोग्य योजनेतून करण्याची डॉ.महिंद्रकर यांना विनंती केली. त्यावेळी डॉ.महिंद्रकर यांनी शासकीय योजनेतून ऑपरेशन करण्याकरीता 16000/- सोळा हजार रुपये द्यावे लागतील तरच ऑपरेशन होईल असे सांगितले. आईस होत असलेल्या वेदना व तिचा त्रास पाहुन तिचे तात्काळ ऑपरेशन करणे गरजेचे असल्याने दि.17/03/2026 रोजी माझ्या जवळील 6000/- रुपये मी डॉ. अरुणकुमार महिंद्रकर यांच्या सांगण्यावरून हॉस्पीटलमध्ये जमा केले त्यानंतर डॉक्टरांनी दि.20/03/2026 रोजी माझ्या आईच्या पायाचे ऑपरेशन केले. आज दि.24/03/2026 रोजी मी व माझे मित्र श्री नानासाहेब भोई दोघे माझ्या आईस डिस्चार्ज देण्याबाबत डॉ. अरुणकुमार महिंद्रकर यांची भेट घेऊन चर्चा केली असता, त्यांनी माझ्याकडे राहिलेले 10,000/- रुपयांची मागणी केली. त्यावेळी मी डॉक्टरांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मोफत उपचार केले जातात त्यामुळे पैसे कशासाठी द्यावे लागेल अशी विचारणा केली असता, डॉ. अरुणकुमार महिंद्रकर यांनी सदर योजनेंतर्गत उपचार करून आम्हाला काय मिळत नाही. तुम्हाला योजनेमध्ये बसवून ऑपरेशन करून दिले त्यासाठी 10,000/- रुपये द्यावे लागतील असे सांगुन पैशाची मागणी केली अशा आशयाची तक्रार सांगितली. तक्रारदार यादव यांना लिखाणाचे खूप कमी ज्ञान असल्याने त्यांचे मित्र नानासाहेब भोई यांनी तक्रारदार यादव यांच्या सांगण्याप्रमाणे सविस्तर तक्रार लिहुन दिली, त्याखाली तक्रारदार यादव यांनी सही केली. त्यानंतर सदरची तक्रार आम्ही व दोन्ही शासकीय पंचांनी वाचून त्यावर सहया केल्या.

तक्रारदार सावळाराम विष्णू यादव यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पंच क्र.1 म्हणून विठ्ठल केरे व पंच क्र.2 म्हणून यशवंत रोकडे यांनी काम पाहण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यादव, दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील सोनी कंपनीचे IC RECORDER ICD-UX570F 5V SONY CORP. MADE IN CHINA 1080938 व्हॉईस रेकॉर्डर व EVM कंपनीचे 08 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवर EVM 8GB MICRO SD HC त्याच्या मागील बाजूस CE MM8GC10AX6D-194 XQH 251104 SM MADE IN TAIWAN EVMTF/8GB1125SE असे वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर आणखीन एक EVM कंपनीचे 08 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवर EVM 8GB MICRO SD HC त्याच्या मागील बाजूस CE MM8GC10FSX6D-243 240816 SM MADE IN TAIWAN EVMTF/8GB0824SE असे वर्णनाचे मेमरीकार्ड त्याचे पाकीटातून काढून ते मेमरीकार्ड लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर या कार्यालयाकडील सॅमसंग कंपनीचे मोबाईलमध्ये टाकून मोबाईलचे स्टोरेज पाथ एस.डी कार्ड सिलेक्ट केले, जेणेकरून निवेदनाचे व्हिडीओ चित्रीकरण करताना चित्रीकरणाचे फाईल मेमरीकार्डमध्ये जतन होईल. त्यानंतर तक्रारदार यादव व दोन्ही पंचांचे निवेदन पडताळणीपुर्व निवेदन 15.16 वा चे सुमारास व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेण्यात आले. तक्रारदार आणि पंचांची निवेदने घेताना त्याचे व्हिडीओ चित्रीकरण वर नमुद मोबाईलच्या माध्यमातून पोना/30 नरोटे यांनी केले. त्यानंतर

आम्ही तक्रारदार यादव, तक्रारदार यांचे मित्र नानासाहेब भोई व पंच क्र.1 केरे यांना पडताळणीकामी योग्य त्या सुचना देऊन 15.28 वा चे सुमारास मंगळवेढा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे रवाना करून डॉ.अरूणकुमार महिंद्रकर यांची पडताळणी केली. पडताळणी दरम्यान डॉ.अरूणकुमार महिंद्रकर व त्यांच्यासोबत हॉस्पिटलमधील एक कर्मचारी यांची तक्रारदार यांनी भेट घेऊन चर्चा केली. यादरम्यान तक्रारदार यांनी महात्मा फुले जनआरोग्य योजनेबाबत चौकशी करत योजनेत ऑपरेशन मोफतच हाय.. असे सांगितले. त्यावेळी हॉस्पिटल मधील कर्मचारी तुम्ही होता का काका? सुरवातील काय सांगितल होत तुम्हाला..ऐकुन घ्या मी काय सांगतोय.. दोन हजार पाच (सन 2005) योजनेचे रेट हायत आज, दोन हजार पाचला (सन 2005) शंभर रुपये पेट्रोल होत किंवा वीस रुपयला होत. आज मिळतय का वीस रुपयला पेट्रोल? असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी आओ..पण महात्मा फुले योजनेतून असे बोलून योजनेतून मोफत उपचार होतात हे सांगण्याचा प्रयत्न केला असता, सदर कर्मचा-याने ऐकून घ्या..ऐकून घ्या.. ऐकून घ्या, माझ पण सांगतो आगोदार ऐका..आज मिळतय का वीस रुपयला पेट्रोल..जी योजनेनं दोन हजार पाचला (सन 2005) रेट दिलाय तीच रेट आज हाय...बरोबर का..मग ही ऑपरेशन करायला आगोदर गव्हर्मेंट आमाला देतय दहा हजार रुपये, अन तुमचा खर्च ऑपरेशनचा येतोय आठरा हजार रुपये..दहा हजार रुपये योजनेतून घ्यायच गव्हर्मेंट कडन अन आठरा हजार रुपये खर्च करायचा.. तुम्ही तर खर्च केला असता का पदरच असत तर..दहा हजार मला देतय गव्हर्मेंट आठरा हजार रुपये घालयावच, बरोबर हाय का.. मग आम्ही काय करतो..ऐका माझं ऐका तुमच बी सगळ ऐकुन घेतो, मी काय बोलतो ते आगोदार ऐका..तुम्हाला पेशंट आणल्या आणल्या आम्ही सांगितलेल असतय बाबा तुमचा बी आठरा हजार पुर्ण प्रायव्हेटमध्ये नको..तुमचाबी निम्मा फायदा व्हावा व आमचाबी फायदा व्हावा. म्हणून तुमच्याकडून दहा हजार रुपये भरुन घ्यायच..ती दहा हजार अस मिळून आठरा हजार रुपये खर्च करायचा अन हॉस्पिटलला सगळ्यामाग दोन हजार रुपये राहत्यात..सर्जन, भूलीचा डॉक्टर पाच हजार रुपये घेऊन जातो.. सर्जन सात हजार रुपये घेऊन जातोय..तुमची हाडाची प्लेट बसवलेली चार-पाच हजाराची प्लेट, इथ अँडमीट केल..ऑपरेशन थिएटरचा चार्ज..तुम्हाला इंजक्शन लावण, सलायन लावण, तीन दिवस पेशंट ठेवण..दोन हजार रुपये नको का एवढा माग हॉस्पीटलला..आणि ही सगळी गोष्ट अँडमीट होताना सांगितलेली असतीय असे बोलून डॉ.महिंद्रकर यांनी मागितलेल्या पैश्याचे समर्थन केले. त्यानंतर योजना व करण्यात आलेल्या ऑपरेशनबाबत चर्चा होत असताना हॉस्पिटलमधील कर्मचा-याने आओ साहेब, सरळ सरळ सांगितलय योजनेत एवढं-एवढं परवडत नाही हॉस्पीटलला पॅकेज, योजनेत निम्म बसवतो, दहा हजार तुम्ही भरा असे बोलून 10,000/- रू. मागणी केली. त्यानंतर तक्रारदार व त्यांचे मित्र नानासाहेब भोई यांनी तडजोड करण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर तक्रारदार यांनी बर आता कस काय करायच असे विचारले. त्यावर कर्मचा-याने पैसे भरणे हा एकच पर्याय हाय काका, दुसरा ह्याज्यापेक्षा पर्यायच नाय.. असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी होय सर तुम्हीच काय तर असे डॉ.अरुणकुमार यांना बोलून तडजोड करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर काहीवेळ योजनेबाबत चर्चा झाल्यावर नानासाहेब भोई यांनी आम्हाला समजल योजनेत सगळ मोफत असत, एवढा विषय आम्ही डोक्यात धरलाय बाकीच आम्हाला असे म्हणाले. तेव्हा डॉ. अरुणकुमार यांनी साहेब तुम्हाला सांगु का कस असतय? गव्हर्मेंट म्हणतय की सगळ तुम्हाला पाच लाखापर्यंत हाय पण आता पर्यंत ऐकल का कुणाला पाच लाख भेटलय म्हणून असे म्हणाले तसेच

डॉ.अरुणकुमार यांनी कस असतय माहिती हाय का? ते हॉस्पीटलला आणि गव्हर्मेंटला माहिती असतय की हॉस्पीटलला किती पैसे भेटणार हायत..आणि पैसे भेटणार आम्हाला कधी..सात-आठ महिन्यानंतर भेटतील..अशी गोष्ट हाय..असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी आता सांगा काय हाय ती..अशी विचारणा केली असता, डॉ. अरुणकुमार यांनी बर ठिक हाय बघा, फायनल सांगतो पाच हजार भरा, ठिक हाय, आमच काय खर्चा वगैरे झाला नाही म्हणून सांगा त्यांना डिस्चार्ज द्या.. असे बोलून महात्मा फुले योजनेतून मोफत उपचार असताना देखील तडजोडीअंती 5000/- रू मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी त्याची पावती वगैरे भेटत नाही? असे विचारले असता, त्यांनी काय भेटणार नाही असे सांगितले. तक्रारदार यांचे मित्र नानासाहेब भोई यांनी सर पावती भेटली असत, तर योजनेत बसवल असत अजून कायतर असे विचारणा केली असता, डॉ.अरुणकुमार यांनी बसत नाय दादा..इतक सगळ क्लिअरली बोलून, सोडून परत दहाच पाच ला केलय.. असे म्हणाले. त्यानंतर नानासाहेब भोई यांनी पाच द्या म्हणताय, पावती दिली तर बर झाल असत.. असे म्हणाले. त्यानंतर डॉ.अरुणकुमार यांनी पावती भेटत नसती दादा.. त्याची पावती भेटत नसती.. असे सांगितले. अशाप्रकारे डॉ.अरूणकुमार महिंद्रकर व त्यांचेसोबत उपस्थित असलेले हॉस्पिटलमधील कर्मचारी यांनी तक्रारदार यादव यांच्या आईचे ऑपरेशन शासनाचे महात्मा फुले जनआरोग्य योजनेमधून करून दिल्याचा मोबदला म्हणून 10,000/- रू. लाच मागणी करून तडजोडीअंती 5000/- रू. लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले.

डॉ.अरूणकुमार महिंद्रकर हे त्यांची वेळ झाल्यानंतर घरी निघून गेल्याने त्यांच्यावर दि.25/03/2026 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरवून सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.
सदरबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि.25/03/2026 रोजी दोन्ही शासकीय पंच, आम्ही स्वत:, पोलीस उपअधीक्षक चौगुले, पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी व चालक पोकॉ/2026 श्रीराम असे आम्ही सर्वजण शासकीय वाहन एम.एच 12 यु.सी 4108 वाहनातून सापळा कारवाईकरीता आवश्यक सर्व साहित्य सोबत घेऊन 09.40 वा चे सुमारास रवाना झालो आणि 10.35 वा चे सुमारास मंगळवेढा-मरवडे रोडवरील बोराळे नाका येथे जाऊन तक्रारदार व त्यांचे मित्र नानासाहेब भोई यांना भेटलो. दि.24/03/2026 रोजीच्या पडताळणीवेळी तक्रारदार यांच्याकडे लाच मागणी केलेले डॉ.महिंद्रकर व त्यांच्यासोबत उपस्थित हॉस्पिटलमधील कर्मचारी यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे नियोजन झाल्यावर तक्रारदार यादव यांनी त्यांच्याकडील बचतीमधील 5000/- रू हजर केले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक लिहून घेणे, तक्रारदार व दोन्ही पंचांना अँन्थ्रासीन पावडरची माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक करणे व हजर केलेल्या नोटांना पावडर लावणे इ. सापळापुर्व कारवाई करण्यात आली. त्यानंतर 11.34 वा चे सुमारास तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन व्हॉईस रेकॉर्डरद्वारे दि.24/03/2026 रोजी पडताळणी व निवेदनाकरीता वापरण्यात आलेल्या मेमरीकार्डमध्ये ध्वनिमुद्रीत करून घेण्यात आले, सदर निवेदन घेताना पोना/30 नरोटे यांनी त्याचे व्हिडीओ चित्रीकरण ला.प्र.वि कार्यालयाकडील सॅमसंग कंपनीचे शासकीय मोबाईलमध्ये यापुर्वी व्हिडीओ चित्रीकरणासाठी वापरण्यात आलेल्या मेमरीकार्डमध्ये केले.

सापळा कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदारांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या. त्यानंतर तक्रारदार यादव, नानासाहेब भोई व पंच क्र.1 केरे यांना

मंगळवेढा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे डॉ.महिंद्रकर व त्यांच्या सोबत उपस्थित कर्मचारी यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही स्वत:, पंच क्र.2, पोना/30 नरोटे व पोकॉ/766 किणगी असे चालत मंगळवेढा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलकडे रवाना झालो.

सापळा कारवाईदरम्यान तक्रारदार यादव, पंच क्र.1 हे हॉस्पिटलच्या आवारात गेल्यानंतर मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वार या ठिकाणी उभारलेले डॉ.अरूणकुमार महिंद्रकर यांच्याजवळ गेले. त्यावेळी भोई हे त्यांच्यापासून काही अंतर ठेऊन हॉस्पिटलच्या आवारात थांबले. हॉस्पिटलच्या मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ डॉ.अरूणकुमार महिंद्रकर हे काही लांकासोबत बोलत थांबलेले पाहून तक्रारदार व पंच क्र.1 त्यांच्याकडे गेले. त्यावेळी तक्रारदार यांनी काल आम्हाला यायला उशीर झाला त्यामुळे असे बोलत त्यांच्या शर्टाच्या खिशात अँन्थ्रासीन पावडर लावून ठेवलेली लाचेची रक्कम उजव्या हाताने बाहेर काढून डॉ.अरूणकुमार महिंद्रकर यांच्यासमोर धरले. त्यावेळी डॉ.महिंद्रकर यांनी आसपास असलेल्या लोकांच्या गर्दीमुळे सदर रक्कम न घेता नाही माझ्याकड देऊ नका असे म्हणून हॉस्पिटलच्या मुख्य इमारतीकडे निघाले. त्यावेळी तक्रारदार यादव यांनी घ्या ना तुम्ही असे म्हणून पुन्हा लाच रक्कम देण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी डॉ.महिंद्रकर यांनी काऊंटरला द्या असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी अहो आता कुठ काऊंटरला आ? असे बोलले. त्यावर डॉ.महिंद्रकर यांनी कोणतेच उत्तर न देता हॉस्पिटलच्या कॅज्युअल्टी रूममध्ये जाऊन बसले. त्यांच्या पाठीमागे जाऊन तक्रारदार यांनी कुणाकड दिऊ? कुणाकड देऊ पाच हजार रूपये असे विचारले. त्यावर डॉ.महिंद्रकर यांनी काल काय झाल? असे विचारले. तेव्हा तक्रारदार यांनी काय पैसे आणलेत काल बोलेल, आम्हाला वेळ झाल यायला असे सांगितले. त्यावर डॉ.महिंद्रकर यांनी इथ सहा वाजता निघून जातेत ते. ते आरोग्य विभागाचे असतात ना ते सहा वाजल्यानंतर जात असतात असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांच्या आईच्या डिसजार्चबाबत विचारणा करून पैसे घेऊन ठेवा तुमच्यापाशी. आम्हाला जायचय. तुम्ही काल बोलले होते असे म्हणाले असता, डॉ.महिंद्रकर हे कॅज्युअल्टी रूममधून बाहेर जाऊन इकडे तिकडे पाहून पुन्हा रूममध्ये गेले, त्यावेळी डॉ.महिंद्रकर यांनी तुमच्यासोबत आलेले कोण आहेत ओ? असे पंचासंदर्भात तक्रारदार यांना विचारले. तेव्हा तक्रारदार यांनी ते पाहूण आहेत आमची असे सांगितले.

यादरम्यान डॉ.महिंद्रकर यांच्याकडे पेशंट व त्यांचे नातेवाईक आल्याने डॉ.महिंद्रकर त्यांचेशी चर्चा करत बसले. काहीवेळाने रूममधून गर्दी कमी झाल्यावर तक्रारदार यादव यांनी पैसे देऊ का? असे विचारले असता डॉ.महिंद्रकर यांनी काऊंटरला भरायच असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी काऊंटरला कुठ भरत बसताव म्हणल असे म्हणताच डॉ.महिंद्रकर यांनी पैसे इथ कोणच घेत नसतय असे बोलून डिसचार्जच ते सगळ साईन वगैरे करून द्या. तिथ फाईल ठेवलय मी असे सांगितले. त्यानंतर पुन्हा डॉ.महिंद्रकर यांच्याकडे पेशंट व त्यांचे नातेवाईक आल्याने डॉ.महिंद्रकर त्यांचेशी चर्चा करत बसले. काहीवेळाने रूममधून गर्दी कमी झाल्यावर तक्रारदार यादव यांनी हि कुठ भरू दे पैसे? असे विचारले. तक्रारदार यादव हे वारंवार डॉ.महिंद्रकर यांच्याकडे पैसे देण्याचा प्रयत्न करत असल्याने डॉ.महिंद्रकर यांनी संशयाने तुमच क्लिअर आहे का दादा सगळ का अजून काय तर, का अजून कायतर मनामध्ये शंका आहे? मला सांगा. नाही पुढ ह्यांनी काय तर अस मनाने करणार असेल तर मग तस नको असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी काय नाही क्लिअर आहे. तसल काय नाही असे म्हणाले. त्यावर डॉ.महिंद्रकर यांनी मला तस नको बी आहे. तुमच्याकडन एक रूपये घेऊन मला

काय आनंद भेटणार नाही असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी तुम्ही बोललाय म्हणून द्यायला आलो असे म्हणाले. तेव्हा डॉ.महिंद्रकर यांनी तस नाही माझ ऐकुन घ्या. माझ्याकडे देऊ नका असे म्हणाले. त्यानंतर काहीवेळ चर्चा झाली. यादरम्यान तक्रारदार यांनी पडताळणीवेही डॉ.महिंद्रकर यांच्यासोबत उपस्थित असलेले कर्मचारी यांची भेट घेण्यासाठी हॉस्पिटलमधून बाहेर जाऊन आवारातील प्रशासकीय कार्यालय येथे गेले परंतू त्यास कुलूप लावलेले असल्याने हॉस्पिटलमध्ये त्यांचा शोध घेतला परंतू ते कुठेच न दिसल्याने हॉस्पिटलच्या मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ गेले, त्याठिकाणी तक्रारदार यादव यांचे मित्र भोई हे तक्रारदार यांना भेटून त्यांचेशी हळू आवाजात चर्चा करून पुन्हा हॉस्पिटलमधील कॅज्युअल्टी रूममध्ये गेलो. त्याठिकाणी गेल्यानंतर तक्रारदार यादव यांचे मित्र भोई हे डॉ.महिंद्रकर यांच्याशी पेशंटच्या डिसचार्जबाबत चर्चा केली. डॉ.महिंद्रकर यांनी डिसचार्जची प्रक्रीया सुरू असल्याचे सांगितल्यावर नानासाहेब भोई यांनी डॉ.महिंद्रकर यांना पैसे घेण्यास विचारणा केली असता माझ्याकड घ्यायच नसतय ते. मला काढून टाकतेत नोकरीवरून. तस आहे मग इथ असे बोलून तक्रारदार यांच्याकडून स्वतः पैसे घेण्यास नकार दिला.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 केरे हे दोघे शासकीय वाहन थांबवलेल्या ठिकाणी जाऊन वाहनात बसले, त्याठिकाणी आम्ही तक्रारदार यादव व पंच क्र.1 केरे यांच्याकडे कारवाईची माहिती घेत असताना तक्रारदार यांचे मित्र नानासाहेब भोई यांनी तक्रारदार यांना फोन करून डिसचार्ज प्रक्रीयेसाठी डॉ.महिंद्रकर हॉस्पिटलमध्ये बोलवत असल्याचे सांगितले. त्यामुळे पुन्हा सापळा कारवाईचे नियोजन करून तक्रारदार यांना पंच क्र.1 यांच्यासह रवाना केले. त्यांच्यापाठीमागे आम्ही, पंच क्र.2 रोकडे, पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी असे चालत जाऊन हॉस्पिटलच्या आवारात सापळा लावून थांबलो.

तक्रारदार यादव व पंच क्र.1 केरे हे हॉस्पिटलमध्ये गेले असता त्याठिकाणी तक्रारदार यांच्या आईस व्हीलचेअरवर आणून योजनेच्या कागदपत्रांची व डिसचार्जची प्रक्रिया पुर्ण करण्यात येत होती. त्यावेळी डॉ.महिंद्रकर यांनी फोटो काढले? झाल फोटो काढून? पाच दिवसानी घेऊन या. पाच दिवसांनी घेऊन या असे बोलून तक्रारदार यांच्या आईस चेकअपसाठी पाच दिवसानंतर घेऊन येण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी काऊंटरला भरू का? पावती दिल की असे विचारले असता, डॉ.महिंद्रकर यांनी नको राहूदे दादा तुम्ही जा असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी पुन्हा काऊंटरला भरतो की पावती द्या असे बोलले असता, डॉ.महिंद्रकर यांनी नको राहूद्या तुम्ही जावा तसच बघू आपण असे बोलून त्यांना पाच दिवसांनी परत घेऊन या. ठिक आहे? जावा असे म्हणून पाठवून दिले. एकंदर सापळा कारवाईवेळी डॉ.महिंद्रकर यांनी तक्रारदार यादव यांच्याकडून लाचेची रक्कम स्वीकारले नसल्याने तसेच डॉ.महिंद्रकर यांनी पाच दिवसांनी तक्रारदार यांच्या आईस तपासणीकरीता घेऊन येण्यास सांगितले असल्याने त्यावेळी सापळा कारवाई नियोजित करण्याचे ठरवून कारवाई स्थगित करण्यात आली. सदरबाबत सविस्तर सापळापुर्व व सापळा पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि.30/03/2026 रोजी दोन्ही शासकीय पंच, आम्ही स्वतः, पोलीस उपअधीक्षक चौगुले, पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी व चालक पोकॉ/2026 श्रीराम असे आम्ही सर्वजण शासकीय वाहन एम.एच 12 यु.सी 4108 वाहनातून सापळा कारवाईकरीता आवश्यक सर्व साहित्य सोबत घेऊन आम्ही 13.50 वा चे सुमारास रवाना झालो. 14.45 वा चे सुमारास आम्ही तक्रारदार यादव यांना फोन करून बोराळे नाका येथे बोलावले असता हॉस्पिटलमध्ये त्यांच्या आईची तपासणी व ड्रेसिंग सुरू

असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार यादव व त्यांचे मित्र भोई हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी येऊन भेटले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यादव यांना सापळा पथक येण्यापुर्वीच डॉ.महिंद्रकर यांची भेट का घेतली असे विचारले असता त्यांनी सांगितले की, हॉस्पिटलमध्ये येऊन नंबर लावल्यानंतर नंबर यायला वेळ लागेल म्हणून मी व भोई असे दोघे माझ्या आईस सुमारे 14.45 वा. हॉस्पिटलमध्ये घेऊन आलो त्यावेळी जास्त पेशंट नसल्याने डॉ.महिंद्रकर यांनी लगेच माझ्या आईस तपासणीकरीता बोलावले त्यामुळे आम्ही तपासणीकरीता गेलो. सदरवेळी डॉ.महिंद्रकर यांनी आईची तपासणी करून ड्रेसिंग केली, तेव्हा त्यांनी माझ्याकडे पुर्वी मागणी केलेल्या लाच रकमेबाबत काहीही विचारणा केली नाही असे सांगितले.

डॉ.अरूणकुमार महिंद्रकर व त्यांच्यासोबत उपस्थित राहून लाचेची मागणी केलेले कर्मचारी हे तक्रारदार यादव यांच्याकडे यापुढे लाच रकमेची मागणी करण्याची शक्यता नसल्याने त्यांच्यावर दि.24/03/2026 रोजीच्या लाच मागणी प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यात यावी असे तक्रारदार यादव यांनी जबाब दिल्याने सदर कारवाई स्थगित करण्यात आली. डॉ.महिंद्रकर यांच्यासोबत लाच मागणी केलेले कर्मचारी यांचे नाव तक्रारदार यांचेकडून सोमनाथ इंगळे असे असल्याची खात्री झालेली असून ते मंगळवेढा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे आरोग्य मित्र या पदावर कार्यरत असल्याची माहीती तक्रारदार यांनी दिली.

तरी दि.24/03/2026 रोजी तक्रारदार सावळाराम विष्णू यादव यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.24/03/2026 रोजी 15.16 ते 16.58 वा. चे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईदरम्यान मंगळवेढा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, मंगळवेढा येथील डॉ.अरूणकुमार महिंद्रकर वय अंदाजे 45 वर्षे व त्यांचेसोबत उपस्थित असलेले सोमनाथ इंगळे वय अदांजे 38 वर्षे यांनी तक्रारदार यांची आई सौ.मंगल विष्णू यादव यांचे पायाचे ऑपरेशन महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतून करून शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी 10,000/- रू. लाच मागणी करून तडजोडीअंती 5000/- रू. लाचेची मागणी करून गैरफायदा प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून मंगळवेढा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, मंगळवेढा येथील डॉ.अरूणकुमार महिंद्रकर वय अंदाजे 45 वर्षे व सोमनाथ इंगळे वय अदांजे 38 वर्षे यांचेविरूध्द मी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद देत आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब

दिला.

समक्ष

पोसई बनकर
पोलीस ठाणे अंमलदार
मंगळवेढा पोलीस ठाणे

**13.**

**Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** DATTADRAYA SHANKAR BORIGIDDE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** DATTADRAYA SHANKAR BORIGIDDE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PSMAH26964

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1988 | | - | | चेचक: क्र. |
| 2 | पुरुष | 1981 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)